१५ व्या वित्त आयोगाचा महाराष्ट्र दौरा
"राज्य अतिथी" घोषित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक: पंविआ १०१७/प्र.क्र.४१/वित्त आयोग कक्ष
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २० जानेवारी, २०१८.

वाचा :- केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाची अधिसूचना क्र.एस.ओ. ३७५५ (इ), दिनांक २७.११.२०१७

प्रस्तावना :-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २८० अन्वये संदर्भाधीन अधिसुचनेनुसार १५ वा वित्त आयोग गठीत केला आहे. आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा कार्य कालावधी सदर पद धारण केल्यापासून आयोगाचा अहवाल सोपविण्याचा दिनांक आणि ३० ऑक्टोबर, २०१९ यापैकी जो दिनांक अगोदरचा असेल तोपर्यंत आहे. या कार्यकाळात सदर आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सल्लागार व पदाधिकारी हे शासकीय कामकाजासाठी महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. सदर दौऱ्याच्या कालावधीत ते राज्य शासनाच्या विविध पातळीवर तथा राजकीय/उद्योग संघटना/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत. या पार्श्वभूमीवर वित्त आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सल्लागार तसेच पदाधिकारी यांना "राज्य अतिथी" म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सल्लागार व पदाधिकारी यांना त्यांच्या कार्यकाळातील महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्याच्या कालावधीत, "**राज्य अतिथी**" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसजीआर-१००२/६८८/सीआर-९२/३१, दि.१ जानेवारी, २००४ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार १५ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सल्लागार व पदाधिकारी यांच्या दौऱ्याच्या व्यवस्थेसाठी होणारा सर्व खर्च वित्त विभागाकडून करण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार कक्षाने याबाबतची देयके वित्त विभागाकडे पाठवावीत.

३. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाने (राजशिष्टाचार) त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६/ कार्यासन ३०, दिनांक १२.०१.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०१२०१६४७५०८८०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaibhav R Rajeghatge

Digitally signed by Vaibhav R Rajeghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f453d869c76bb9b100c9474614e3d97070719ea461f32ccfef10b55651861f13, cn=Vaibhav R Rajeghatge
Date: 2018.01.20 16:36:10 +05'30'

(वैभव राजेघाटगे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव,

३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त)/ अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (न.वि. -१), नगर विकास विभाग , मंत्रालय, मुंबई,
१०. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई,
११. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१,लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता, मुंबई,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. सह सचिव/उप सचिव(अर्थसंकल्प/व्यय-२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. व्यवस्थापक, सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई.
१७. अवर सचिव, रोख शाखा/कार्यासन (प्रशा.५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. निवडनस्ती, वित्त आयोग कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
